महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २०४ वा | दिनांक : ०६/०६/२०२५ | वार : शुक्रवार

# अकोला डीपीडीसी बैठकीत मोठा राडा



**अकोला :** जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीदरम्यान मोठा राडा झाल्याचे पाहायला मिळाले. यावेळी भाजपचे आमदार रणधीर सावरकर आणि शिवसेना ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. या वादानंतर बैठकीत तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. बैठकीनंतर दोन्ही लोकप्रतिनिधींचे कार्यकर्ते आमने-सामने आल्याचे पाहायला मिळाले. जिल्ह्याच्या डीपीडीसीच्या बैठकीतच राडा झाल्याने या घटनेची सध्या जोरदार चर्चा होत आहे.

अकोला जिल्हा नियोजन समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडत होती. बैठकीच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री आकाश फुंडकर हे होते. यावेळी चर्चेदरम्यान दलित वस्ती सुधार योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात प्रश्न उपस्थित करताना ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख बोलत होते. दरम्यान, भाजपचे आमदार रणधीर सावरकर मध्येच बोलले. यावरून दोन्ही आमदारांमध्ये वाद निर्माण होऊन शाब्दिक चकमक झाली. या घटनेमुळे बैठक काही काळ विस्कळीत झाली.

आमदार रणधीर सावकर आणि आमदार नितीन देशमुख यांच्यात बाचाबाची झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर दोघांचे कार्यकर्ते आमने-सामने आले. यावेळी दोन्ही नेत्यांचे कार्यकर्ते एकमेकांवर धावून गेले. दोन्ही गटाकडून एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

सभेमध्ये शाब्दिक वाद झाला, पण शिवीगाळ झाली नाही, असे भाजपचे आमदार रणधीर सावरकर यांनी म्हटले आहे. आम्ही लोकशाही मानणारे आहोत. एखाद्या मुद्द्यावर मतभेद होऊ शकतात. ते पुढेही राहतील. आम्ही आमची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. तिथे काही लोक शुटींग करत होत. त्याला पालकमंत्र्यांनी आक्षेप घेतला होता. त्यावर नितीन देशमुख यांनी शुटींगसाठी तिथेच बसतील असे म्हटले. त्यावर मी हे योग्य नाही, असे म्हटले. या विषयावरून शब्दाला शब्द वाढत गेला. पण शिवीगाळ अजिबात झालेली नाही. एकमेकांच्या अंगावरही कुणी गेलेले नाही, असे रणधीर सावकर यांनी स्पष्ट केले.

बैठकीत निधी वाटपावरून कोणताही वाद झाला नाही. त्याठिकाणी नितीन देशमुख यांचे दोन-तीन समर्थक शुटींग काढत होते. पालकमंत्र्यांनी शुटींग न करण्याचे निर्देश दिले. फक्त एवढाच विषय होता, असे रणधीर सावरकर यांनी स्पष्ट केले.

माझा प्रश्न मांडण्याचा अधिकार आहे. त्यानुसार मी सभागृहात प्रश्न उपस्थित केला असता, कुणीच उत्तर द्यायला तयार नव्हते. सत्ताधारी महानगरपालिकेला कलप करत आहेत. त्यांची मनमानी सुरू आहे. दलित वस्तीचे पूर्ण कलप केले. जिल्हा परिषदेचा 26 कोटींचा निधी यांना न भेटल्यामुळे तो निधी परत पाठवला, असा आरोप ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांनी केला आहे. शासनाचा 29 कोटींचा परत का पाठवला? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. शासनाचे 29 कोटी परत गेले, असा अकोला महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा आहे. आतापर्यंतच्या इतिहासात कधीच असे घडले नाही.

जिल्हा परिषदेचा दलित वस्तीचा निधी इतिहासात कधीच महानगरपालिकेला ट्रान्सफर झाला नाही. यांनी दलित वस्तीचे कलप केले. एका कंत्राटदाराला कॉन्ट्रॅक्ट देण्यासाठी कलप करत आहात का? असा सवालही नितीन देशमुख यांनी केला. जिल्ह्यात पांढऱ्या कपड्याच्या आडून भयंकर मोठा भ्रष्टाचार सुरू आहे. यासाठी स्थानिक नेते जबाबदार असल्याचा आरोपही नितीन देशमुख यांनी केला.

# हिंदुत्व आणि ठाकरे म्हणजे महाराष्ट्र




**नाशिक :** राज्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना ठाकरे गट यांच्यात युतीच्या चर्चांना वेग आला असताना, नाशिकमध्ये या दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये जणू पुढचा टप्पा गाठल्याचे दृश्य पाहायला मिळाले. मनसेच्या नाशिकमधील नव्या कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी, उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी आणि इतर अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

या उद्घाटनप्रसंगी वास्तुशांती पूजाही आयोजित करण्यात आली होती. विशेष म्हणजे, कार्यक्रमात "हिंदुत्व आणि ठाकरे म्हणजे महाराष्ट्र" असा संदेश असलेला एक फलक झळकवण्यात आला होता, ज्यावर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचे संयुक्त छायाचित्र होते.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या शिवसेना आणि मनसे कार्यकर्त्यांनी एकमुखाने मत व्यक्त केले की, दोन्ही नेत्यांनी आता एकत्र यावे, ही महाराष्ट्रातील जनतेची खरी गरज आहे. "हिंदुत्वाचा उल्लेख करून भारतीय जनता पार्टीनेच खऱ्या अर्थाने त्याचा अपमान केला," असा आरोपही या वेळी करण्यात आला.

नाशिकमधील हा प्रसंग म्हणजे कार्यकर्त्यांच्या मनातील भावना आणि राजकीय समीकरणांचे बदलते वारे यांचे प्रतीक ठरत आहे. डोंबिवलीनंतर नाशिकमध्ये घडलेला हा संवाद आणि एकत्र येण्याचा संकेत आगामी राजकारणात मोठा परिणाम घडवू शकतो.

मनसे शिवसेना युतीबाबत माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना अमित ठाकरे म्हणाले, दोन्ही भाऊ एकत्र आले तर मला काही प्रॉब्लेम नाही. मात्र त्यांची (राज ठाकरे आणि उध्दव ठाकरे) इच्छा असेल तर त्यांनी फोन करावा. दोघांकडे एकमेकांचा नंबर आहे. आम्ही बोलून काही फरक पडणार नाही. दोन भावांनी एकत्र यावे हे त्यांनी ठरवावे. राज ठाकरे यांची इच्छा असेल ती माझी इच्छा. पुढाकार कोणी घ्यावा हे त्यांनी ठरवावे.

# फडणवीसांच्या हस्ते 'समृद्धी' मार्गाचे लोकार्पण

**नाशिक :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नाशिकमधील इगतपुरी ते ठाण्यातील आमणे पर्यंतच्या 76 किमी लांबीच्या समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे उद्घाटन आज झाले आहे. यामुळे एका अर्थाने मागील वेळी मुख्यमंत्री असताना फडणवीस यांनी पाहिलेले स्वप्न आता पूर्ण झाले आहे. यामुळे नागपूर ते मुंबई मधील अंतर कमी झाले असून वेळेची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.

राज्याच्या पायाभूत सुविधांच्या विकास गाथेतील एक मुकुटमणी, 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग'चा अंतिम टप्पा (इगतपुरी ते आमणे - 76 किमी) सज्ज झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते समृद्धी महामार्गावरील इगतपुरी—आमणे (76 किमी) अंतिम टप्प्याचे भव्य लोकार्पण होत आहे. या लोकार्पणानंतर संपूर्ण 701 किमी लांबीचा समृद्धी महामार्ग वाहतुकीसाठी खुला होऊन नागपूर—मुंबई प्रवास फक्त 8 तासांत पूर्ण करता येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह प्रमुख मंत्र्यांच्या उपस्थितीत या समृद्धी महामार्गाच्या अखेरच्या टप्प्याचे लोकार्पण करण्यात आले. यानंतर या मार्गावरील बोगद्यातून या तिन्ही नेत्यांनी प्रवास केला. विशेष म्हणजे या वेळी देवेंद्र फडणवीस यांची गाडी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चालवली. या आधी मागील वेळी झालेल्या कार्यक्रमात एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना त्यांची गाडी देवेंद्र फडणवीस यांनी चालवली होती

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ जून २०२५


## वृक्षारोपणाबरोबर वृक्ष संवर्धन काळाची गरज : प्राचार्य डॉ. संजय अस्वले



**मुरुम (प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले):** जागतिक पर्यावरण दिनाची सुरुवात १९७२ मध्ये स्टॉकहोम (स्वीडन) येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण परिषदेपासून झाली. १९७३ पासून हा दिवस दरवर्षी संपूर्ण जगभर साजरा केला जातो. यानुसार आपण दरवर्षी किमान एक झाड लावावे.प्लास्टिक वापरणे टाळावे. पाण्याचा अपव्यय थांबवावा. पर्यावरण संरक्षणाविषयी इतरांमध्ये जागरूकता निर्माण करावी. वृक्षारोपण म्हणजे झाडे लावण्याची प्रक्रिया होय. ही एक पर्यावरण रक्षणाची महत्त्वाची क्रिया आहे, कारण झाडे आपल्याला प्राणवायू देतात, कार्बनडायऑक्साइड शोषून घेतात आणि हवामानाचे संतुलन राखतात. झाडे हवेमधील प्रदूषक घटक कमी करतात.

पर्जन्यमान वाढवतात: झाडांमुळे जमिनीची आर्द्रता टिकून राहते. म्हणुन वृक्ष संवर्धन म्हणजे लावलेल्या झाडांची योग्य काळजी घेणे व त्यांचे संरक्षण करणे. झाडे लावणे महत्त्वाचे असले तरी, त्यांची वाढ होईपर्यंत त्यांची निगा राखणे अधिक महत्त्वाचे आहे. पर्यावरण दिन साजरा करताना वृक्षारोपण बरोबर वृक्ष संवर्धन ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉक्टर संजय अस्वले यांनी केले.येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा ग्रीन क्लब हरित सेना यांच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन साजरा करताना वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनासाठी संरक्षक जाळी उपक्रमाची सुरुवात महाविद्यालय परिसरात करण्यात आली. दरवर्षी महाविद्यालयात एक शिक्षक एक वृक्ष आणि एक विद्यार्थी एक वृक्ष या अभियानांतर्गत दत्तक वृक्ष योजना सुरू आहे. चालू शैक्षणिक वर्षाची 2025-26 सुरुवात पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनाने करण्यात आली.

यावेळी पुढे बोलताना प्राचार्य अस्वले यांनी वृक्षारोपण हे आजच्या पर्यावरणीय समस्यांवर उपाय देणारे प्रभावी साधन आहे, पण त्याचे खरे मूल्य तेव्हा समजते जेव्हा आपण त्याचे संवर्धन करतो. पर्यावरण वाचवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे ही काळाची गरज असे आव्हान केलेयावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पी ए पिटले डॉ. बी के लबडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. बी ए शेळके डॉ. दामू बिराजदार, डॉ. ए एस पदमपल्ले, डॉ. डी बी ढोबळे, प्रा. काकनाळे, डॉ. पी डी पाटील, श्री अनिल तुंगी तुंगे,श्री भालेराव, श्री एस एस जगताप, श्री धनु पाटील या हरित सेना आणि ग्रीन क्लब सदस्यांची उपस्थिती होती.

## डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन साजरा




**छत्रपती संभाजीनगर : (डॉ. प्रतिभा ढोंडकर)** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि ग्रीन कल्बच्या समन्वयाने दिनांक 5 जून रोजी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व ग्रीन क्लब समन्वयक डॉ. मीनल श्रीगिरीवार तसेच डॉ. सुनंदा चक्रनारायण, डॉ. प्रेमला मुखेडकर, प्रा. ज्योत्स्ना जावळे, प्रा. मंगल मोरे, डॉ. प्रतिभा धोंडकर, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली.

त्यानंतर स्वयंसेविकांनी महाविद्यालयाच्या आवारात विविध प्रकारची फळझाडे व औषधी वनस्पती लावल्या. यामध्ये आम्र, आवळा, अशोक, गुलमोहर, वड, पिंपळ, तुलसी इत्यादी प्रजातींचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य आणि राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी पर्यावरणाचे महत्त्व सांगत झाडे लावणे आणि त्यांचे जतन करणे ही काळाची गरज असल्याचे नमूद केले.

स्वयंसेविकांनी भविष्यातही वृक्षसंवर्धनाच्या कार्यात सक्रीय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मार्गदर्शन लाभले.

वृक्षारोपण उपक्रमाने रासेयो स्वयंसेविकांमध्ये पर्यावरणपूरक विचार जागवले आणि नैसर्गिक संतुलन राखण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले.

## शेतकरी योद्धा कृती समितीचं कृषीमंत्र्यांना निवेदन — बुलढाणा जिल्ह्यातील ८०% पीक विमा त्वरित देण्याची मागणी



**बुलढाणा (महेश मुंढे) :** बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा २०२३-२४ खरीप व रब्बी हंगामातील तब्बल ८०% पीक विमा रखडलेला असून, तो त्वरित वितरित करावा, या मागणीसाठी शेतकरी योद्धा कृती समितीच्या वतीने कृषीमंत्री माणिकदादा कोकाटे यांना दिनांक ४ जून २०२५ रोजी निवेदन देण्यात आलं.या निवेदनाद्वारे शेतकरी बालाजी सोसे, गजानन जायभाये व गजानन सोनुने यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा कृषीमंत्र्यांसमोर ठामपणे मांडल्या. त्यानंतर कृषीमंत्र्यांनी आजच (४/६/२०२५) होणाऱ्या बैठकीत या विषयावर निर्णय घेण्यात येईल, असं आश्वासन दिलं.विशेष म्हणजे, बुलढाणा जिल्ह्यातून आलेल्या शेतकरी प्रतिनिधींची भेट कृषीमंत्र्यांशी मंत्रालयात पोलिसांच्या बंदोबस्तात घडवून आणण्यात आली. सकाळी १० वाजेपासून पोलीस संरक्षणात ही भेट झाली. पाच ते सहा पोलीस कर्मचारी यासाठी तैनात होते.कृषीमंत्री माणिकदादा कोकाटे यांनी शेतकऱ्यांना आश्वासन दिलं की, आजच्या बैठकीत पीक विम्याच्या संदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात येणार असून संबंधित विभागाला तात्काळ कारवाईचे आदेश दिले आहेत.शेतकरी योद्धा कृती समिती, बुलढाणा जिल्हा




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ जून २०२५


## दहावी-बारावी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**उमरगा, (प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले)** : येथील रत्नमाला मंगल कार्यालयात गुरुवारी (ता.५) रोजी एक प्रेरणादायी सोहळा पार पडला. हरियाणा राज्यातील पानिपत या ठिकाणी क्षेत्रीय प्रबंधक या पदावर कार्यरत असलेले डॉ. शिवाजी शिंदे यांच्या वतीने दिवंगत सिद्राम गंगाराम शिंदे (गुरुजी) यांच्या १० व्या स्मृती दिनाचे औचित्य साधून इयत्ता दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन भुजबळ होते. प्रमुख अतिथी म्हणून ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश अर्दाळे, पोलीस उपनिरीक्षक डी. डी. गव्हाणे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, धम्मचारी धम्मभूषण राम कांबळे, प्रमोद कुलकर्णी, मनोहर शिंदे, गंगाधर शिंदे, शिवाजी कवाळे, प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले, पत्रकार महेश निंबरगे, डॉ. खाजालाल ढोबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. शिवाजी शिंदे यांना नुकतीच युगांडा येथील आंतरराष्ट्रीय संस्थेकडून मानद डॉक्टरेट पदवी प्राप्त, भारत सरकारच्या डाक विभागाकडून पाच रुपयाचे तिकीट जाहीर, महाराष्ट्र पत्रकार संघाचा राष्ट्रीय नवरत्न पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार मान्यवर व पत्रकारांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सत्कार समारंभात सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे मार्गदर्शन केले. गुण हे जीवनाचे अंतिम उद्दिष्ट नाहीत, तर उत्तम माणूस होणे हे खरे शिक्षण आहे. मानवतेचे भान ठेवून विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारत, कोणत्याही सेवेच्या क्षेत्रात सामान्य जनतेच्या कल्याणासाठी कार्य करण्याची नितांत आवश्यकता आहे, असे सामूहिक मनोगत मान्यवरांनी व्यक्त केले. स्पर्धात्मक युगात आत्मभान, मूल्याधिष्ठित जीवनशैली आणि समाजाभिमुख कार्यशीलता विद्यार्थ्यांनी आत्मसात करावी, असा सल्लाही त्यांनी दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सचिन भुजबळ यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांमध्ये आशावादाची नवी ऊर्जा फुंकली.

"यश मिळवताना प्रामाणिक प्रयत्न, चिकाटी आणि सामाजिक जाणीव या गोष्टी महत्त्वाच्या असतात. आपण ज्या क्षेत्रात काम कराल, तेथून समाज बदलू शकतो. केवळ मोठे पद किंवा अधिकार नव्हे, तर समाजासाठी काही सकारात्मक देण्याची वृत्ती बाळगली पाहिजे," असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन अजिंक्य मुरुमकर यांनी तर आभार तात्यासाहेब शिंदे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी सचिन शिंदे, वसंत शिंदे, धनराज शिंदे, ज्योतीराम शिंदे, दत्ता खरटमल, वैभव कटके आदींनी मोलाचे योगदान दिले.

विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, खास डॉक्युमेंट फाईल, पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या आई-वडिलांसह सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मुरुम शहरात एक सकारात्मक व उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले.

## नागरे महाविद्यालयात राबविण्यात आला जागतिक पर्यावरण दिन




**सिंदखेड राजा (महेश मुंढे)** : दुसरबीड येथे नारायणराव नागरे महाविद्यालयमध्ये दिनांक 5 जून 2025 रोजी जागतिक पर्यावरण दिन चे औचित्य साधून वृक्ष लागवड जनजागृती करण्याच्या हेतूने भारत सरकारने राबवलेल्या उपक्रम एक वृक्ष माँ के नाम, हा उपक्रम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने राबवण्यात आला . पुढील पंधरा दिवसांमध्ये जनजागृती पटनाट्य वृक्ष लागवड चर्चा असेल तर निबंध स्पर्धा पोस्टर प्रेझेंटेशन असे विविध उपक्रम राबविण्याचे विद्यार्थ्यांमध्ये व नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी या दृष्टीने राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व प्राचार्य डॉ . विजय नागरे अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांनी मार्गदर्शन केले यावेळी भगवान व महाविद्यालय सिंदखेड राजा येथील प्राध्यापक डॉक्टर पंढरीनाथ डोईफोडे व उत्कर्ष महाविद्यालय सिंदखेडराजा येथील प्राध्यापक खरात उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक दीपक देशमाने कार्यक्रम नियोजन प्राध्यापक डॉक्टर गणेश विजय प्राध्यापक देवानंद नागरे श्री गजानन मुंडे श्री बालू पंढरे विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ जून २०२५


## बारवाले महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन विविध उपक्रमाद्वारे साजरा



**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयातील भूगोल विभाग, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (आयक्यूएसी) विभागाद्वारे जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी श्री. दिपक बनसोड, एस.आर.ओ. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना, डॉ. प्रताप गर्जे, केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळ (सल्लागार), जालना, श्री. रविंद्र जाधव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना हे उपस्थित होते.

या प्रसंगी प्लास्टीक पिशव्यांचा वापर न करण्याचे आवाहन बनसोड यांनी केले ते म्हणाले प्लास्टीकमुळे मोठ्या प्रमाणात प्रदुषण होते ते कमी केले पाहिजे, या वर्षी जागतिक स्तरावर प्लास्टिक निर्मूलन हा मुख्य विषय राबवण्यासाठी ठेवला आहे त्याचे आपण सर्वांनी पालन करावे व हा दिवस तेंव्हाच खऱ्या अर्थाने साजरा होईल.

या प्रसंगी कु. वैशाली मिल हिने प्रदुषणाचे विविध मार्ग आणि ते रोखण्यासाठी आपण घ्यावयाची भूमीका काय असली पाहिजे याविषयी विचार व्यक्त केले.श्री दिपक बनसोड, डॉ. प्रताप गर्जे, श्री रविंद्र जाधव याच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.या प्रसंगी प्लास्टीक पिशव्या न वापरण्यासंबंधी, पर्यावरण रक्षण आणि पर्यावरण दिनाविषयीचे पोस्टर्स प्रदर्शीत करण्यात आले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे उपस्थित सर्वांना कापडी पिशव्या देण्यात आल्या.

या प्रसंगी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. कल्याण कुंभार, डॉ. नंदकुमार शिंदे, महाविद्यालयातील महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे श्री. संतोष हराळकर, श्री. प्रदीप शिराळे, श्री. गोविंद पाचरणे, श्री. कृष्णा मांडवे श्री. विजय लोणकर, श्री. राम हिवरेकर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## महानगरपालिका शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी डॉ.संपत निवृत्ती इधाटे यांची बिनविरोध निवड



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका शिक्षक सहकारी पतसंस्था शहर मर्यादित औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर पतसंस्थेची पंचवार्षिक निवडणूक 17 मे 2025 रोजी पार पडली. या निवडणूक साठी श्रीमती सुषमा साबळे यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची भूमिका बजावली. निवडणूक अत्यंत पारदर्शक व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. या निवडणुकीत सेवाभावी शिक्षक पॅनल व उत्कर्ष विकास पॅनल असे दोन पॅनल चे उमेदवार उभे होते.

दोन अपक्ष उमेदवार उभे होते या निवडणुकीत सेवाभावी शिक्षक पॅनल चा दणदणीत विजय होत 13 संचालकापैकी 11 संचालक निवडून आले उत्कर्ष विकास पॅनलचे दोन संचालक निवडून आले. सेवाभावी शिक्षक पॅनलचे पॅनल प्रमुख डॉ.संपत निवृत्ती इधाटे, पॅनल उपप्रमुख जुबेर ताज महंमद शेख, सुनील सुखदेव नरवडे, तुषार संपत ताठे, सुभाष विठ्ठलराव पंडित, किशोर भाऊसाहेब दांडगे, विशाल गंगाधर बाविस्कर, रशिदुन्निसा बेगम वासेक अली, संगीता मनोहर चव्हाण, सचिन काशिनाथ गायकवाड, विजय लिंबाजीराव कोल्हे.

उत्कर्ष विकास पॅनलचे राम सोनाजीराव सावंत, रामेश्वर येसूबा बोराडे यांचा विजय झाला. आज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या बैठकीत. अध्यक्षपदी डॉ . संपत निवृत्ती इधाटे यांची उपाध्यक्षपदी डॉ . रशीदुनिसा बेगम वासेक अली तर श्री.तुषार संपत ताठे यांची सचिव पदी निवड करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती सुषमा साबळे, निबंध कार्यालयाचे कर्मचारी श्री जगताप, उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे साहेब ,सेवाभावी पॅनलचे प्रणेते शेख मुनिरुद्दीन सर, माननीय शिक्षणाधिकारी श्री तीनगोटे साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी श्री रामनाथ थोरे व सर्व संचालकांनी अध्यक्ष उपाध्यक्ष व सचिव यांचे खूप खूप अभिनंदन करीत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत..

## हिवरखेडा गौताळा येथे १५ वर्षीय शितल जाधवचा विजेचा धक्का लागून मृत्यू;



**कन्नड (स्वप्निल राठोड)** — कन्नड तालुक्यातील हिवरखेडा गौताळा गावात मंगळवारी एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली. अवघ्या १५ वर्षीय शितल सुदाम जाधव हिला विजेचा धक्का बसून जागीच मृत्यू झाला.

ही दुर्घटना दुपारी अंदाजे १२ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली.शितल सकाळी नळाचे पाणी भरण्यासाठी गेली होती. यावेळी ती पाण्याच्या मोटारची पिन जोडत असताना अचानक वीजपुरवठा खंडित झाला आणि काही क्षणांतच पुन्हा वीजपुरवठा सुरू करण्यात आला. त्याच क्षणी मोटार सुरू झाली आणि शितलला जोरदार विद्युत धक्का बसला. धक्का इतका तीव्र होता की तिचा जागीच मृत्यू झाला.MSEB च्या निष्काळजीपणामुळे जीव गेला — ग्रामस्थांचा आरोपया घटनेनंतर ग्रामस्थांत तीव्र संताप निर्माण झाला असून, त्यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (MSEB) वर निष्काळजीपणाचा ठपका ठेवला आहे.

“MSEB ने कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक वीजपुरवठा बंद करून लगेच पुन्हा सुरू केला. त्याचा थेट परिणाम शितलच्या जिवावर झाला,” असा आरोप नागरिकांनी केला आहे.गावकऱ्यांनी संबंधित वीज अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. तसेच भविष्यात अशा प्रकारची घटना घडू नये म्हणून वीज व्यवस्थापन अधिक सुरक्षित आणि सूचनांसहित असावे, अशी मागणीही केली जात आहे.

गावात हळहळ व शोककळा शितलच्या अकस्मात निधनामुळे जाधव कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. शाळकरी वयातच तिचे आयुष्य संपल्याने संपूर्ण समाजात हळहळ व्यक्त केली जात आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274 ,8956362639 , 9270446603 , 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.टी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ जून २०२५


## डिजिटल मीडिया पत्रकारांसाठी शासनाचा मोठा निर्णय ; मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्याकडून सरकारच्या निर्णयाचे स्वागत

**मुंबई :** डिजिटल मीडियावर काम करणाऱ्या सर्वच डिजिटल पत्रकारांना शासन दरबारी हक्काच्या जाहिराती मिळाव्यात यासाठी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्य अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांच्या मार्गदरणाखाली डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, राज्य कार्याध्यक्ष संतोष शिंदे व संपूर्ण डिजिटल मीडिया परिषद सातत्याने पाठपुरावा करत होती आज अखेर या संघटनात्मक पाठपुराव्याला यश आले असून राज्य सरकारने 3 जून 2025 रोजी एक शासन निर्णय जाहीर करून डिजिटल मीडियावरील फेसबुक, युट्युब आणि इन्स्टाग्राम या माध्यमातून पत्रकारिता करणाऱ्या डिजिटल पत्रकारांना हक्काचा रोजगार देण्यासाठी शासकीय जाहिराती सुरू केल्या आहेत.

गेल्या अनेक दिवसापासून मराठी पत्रकार परिषद संलग्न डिजिटल मीडिया परिषद यासाठी सातत्याने विविध मंत्र्यांना भेटून डिजिटल मीडियाबद्दलची सखोल माहिती देत होते आणि डिजिटल मीडियाच्या माध्यमातून कशा पद्धतीने शासनाच्या जाहिराती लोकप्रिय होतील याबद्दल सांगत होते. अखेर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्वच मंत्र्यांनी एकमत दाखवत डिजिटल माध्यमांना जाहिराती सुरू करण्याचा एक मोठा निर्णय घेतला आहे.

शासनाने घेतलेल्या या निर्णयाचे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद व डिजिटल मीडिया परिषदेकडुन स्वागत करण्यात आले असून डिजिटल मिडिया मध्ये काम करणाऱ्या पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिका मिळावी यासाठी सुध्दा मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मिडिया परिषद सरकारकडे पाठपुरावा करीत असल्याचे मत मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी स्पष्ट केले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## प्रा. राजेंद्र नेवगे या वर्षीच्या लोकमाता अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सन्मानित



**कन्नड :** तालुक्यातील अंधानेर येथील प्रा राजेंद्र नेवगे हे देवगावं (रं) येथील श्री गणेश कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असून त्यांना यावर्षीचा लोकमाता अहिल्यादेवी होळकर सन्मान पुरस्काराने कोल्हापूर येथे सन्मानित करण्यात आले.लोकमाता अहिल्यादेवी यांच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त आयोजित राज्यस्तरीय पुरस्काराचे आयोजन कोल्हापूर येथील मानवतावादी संस्कृतीक चळवळ, आम्ही भारतीय महिला मंच तसेच लोकमाता अहिल्याबाई विचारमंच यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू स्मारक भवन येथे मोठ्या दिमाखदार सोहळ्यात प्रा राजेंद्र नेवगे यांना यावर्षीचा लोकमाता अहिल्याबाई होळकर सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला.

प्रा राजेंद्र नेवगे हे गेल्या 25 वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक चळवळीत तथा पत्रकार म्हणूनही उत्कृष्ट असे काम करित असतात.ते एक उत्तम व्याख्याते तथा प्रेरणादायी मार्गदर्शक म्हणूनही परिचित आहेत.आपल्या आजूबाजूला नेहमीच विध्यार्थ्यांचा घोळका हे त्यांचे मुख्य वैशिष्टये आहे.त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन देशातील तथा राज्यातील मोठ-मोठ्या शासकीय तथा निमशासकीय सामाजिक संस्थानी आतापर्यंत त्यांना जवळपास 15 पुरस्कार दिले आहेत. त्यामध्ये 6 राष्ट्रीय व इतर पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

मागील वर्षीचा महाराष्ट्र गौरव व राष्ट्रीय स्तरावरील ग्लोबल नॅशनल व महात्मा गांधी या पुरस्काराचा विशेष उल्लेख करावा लागेल. यावेळी राज्यातून अजून 7 जणांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुंबई येथील लेखिका, विचारवंत तसेच प्रसिद्ध दंतचिकित्सक डॉ वर्षा चौरे यांच्या व्याख्यानाचे तथा पुस्तक विमोचानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री बबनराव रानगे होते.याप्रसंगी प्रसिद्ध कायदेतज्ञ् ऍड मंचकराव डोणे, दिग्दर्शक तथा प्रकाशक अनिल म्हमाने, जेष्ठ कामगार नेते सुरेश केसरकर, प्रा टी के सरगर, निर्मिती विचारमंचच्या ऍड शोभा चोळके, आम्ही भारतीय महिला मंचच्या ऍड करुणा विमल व दिक्षा चारिटेबलचे विश्वासराव तरटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार तथा मुख्य नियोजन अंतिमा कोल्हापूरकर यांनी केले. यावेळी कोल्हापूर शहरातील पुरोगामी चळवळीचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रा राजेंद्र नेवगे यांच्या या यशामुळे त्यांचे श्री गणेश शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ प्रकाश भांडवलदार, सचिव एल डी भांडवलदार, सर्व कार्यकारिणी,प्राचार्य-सर्व शिक्षक बांधव तथा जन्मभूमी मित्र मंडळींनी अभिनंदन केले आहे.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ जून २०२५


## बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेच्या वार्षिक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन



**जालना :** बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) संयुक्त वार्षिक प्रशिक्षण शिबिराचे (सीएटीसी) आयोजन दि. २ ते ११ जून २०२४ या कालावधित संपन्न होणार आहे.

५० महाराष्ट्र बटालियनच्या वतीने आयोजित या शिबिरात ४३९ एनसीसी कॅडेट्सने (मुले आणि मुली) सहभाग घेतला असून या शिबिरात त्यांना सामूहिक ड्रिल, परेड, रायफल ऑपरेशन, नेमबाजी, मानवंदना या व्यतिरिक्त मॅप रीडिंग, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन आदी विषयांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

५० महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल बी. पी. एस. ठाकूर, कर्नल कीर्ती मुडले, डॉ. कुणाल देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर चालणार आहे.एनसीसी आणि भारतीय लष्कर हे दोन्ही अतिशय जवळून आणि हातात हात घालून काम करतात. एनसीसी आपल्या कॅडेट्सना लष्करी प्रशिक्षण देते आणि त्यांना भारतीय लष्करासह इतर सशस्त्र दलांमध्ये करिअरसाठी तयार करते.

एनसीसीचे अनेक कॅडेट्स शिक्षण पूर्ण केल्यानंतर भारतीय लष्करात भरती होतात. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, एकात्मता, शिस्त, आत्मविश्वास, नैतिक आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्यामध्ये राष्ट्रीय छात्र सेनेची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. असे यावेळी कर्नल बी. पी. एस. ठाकूर यांनी सांगितले.या शिबिरासाठी प्राचार्य कविता प्राशर यांच्यासह महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीच्या पदाधिकारी यांनी हे शिबिर यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## चिखली पोलीसांची कारवाई : गहाळ मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांत समाधान

**चिखली- (महेश मुंढे) :** चिखली पोलीस स्टेशनच्या हद्दीत गेल्या काही काळापासून मोबाईल गहाळ होण्याच्या घटना वारंवार समोर येत होत्या. यावर कारवाई करत ठाणेदार संग्राम पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्थापन केलेल्या पथकाने 2.57 लाख रुपयांचे 21 मोबाईल हस्तगत करून मुळ मालकांना परत केले आहेत.

ठाणेदार संग्राम पाटील यांनी पोलीस अंमलदार विजय किटे, सुनिल राजपूत आणि महिला पोलीस अंमलदार रुपाली उगले यांच्या पथकाला या प्रकरणात शोधकार्यासाठी सुचना दिल्या होत्या. पथकाने गोपनीय व तांत्रिक माहितीच्या आधारे विविध ठिकाणांवर शोधमोहीम राबवली. यामध्ये Oppo, Vivo, Samsung, OnePlus, Redmi यांसारख्या विविध कंपन्यांचे मोबाईल सापडले.

हस्तगत केलेल्या मोबाईल्सची किंमत:सदर मोबाईल्सची एकूण किंमत 2,57,000/- रुपये इतकी असून, त्यामध्ये Oppo Reno 10 (25,000/-), Vivo A3 Pro (18,000/-), आणि OnePlus Ce2 (15,000/-) अशा उच्च दर्जाच्या फोनचा समावेश आहे.मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांनी पोलीस विभागाच्या या कार्यवाहीबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन:सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक बि. बि. महामुणी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या यशस्वी मोहिमेमुळे चिखली पोलीसांचे काम कौतुकास्पद ठरले आहे.

नागरिकांचे समाधान:या प्रकरणामुळे चिखली पोलीस विभागावर नागरिकांचा विश्वास आणखी दृढ झाला असून अशा प्रकारच्या कार्यवाहीने नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT

X-RAY | C.T.-SCAN

E.C.G. | Radiology

Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact : 9405109103 8830838903


## कोनडच्या शेततळ्यात बुडून तीन चिमुकल्यांचा दुर्दैवी मृत्यू



**चिखली (महेश मुंढे) :** विदर्भ व मराठवाड्याच्या सीमेवर असलेल्या वरुड ता. जाफराबाद येथील तीन चिमुकल्यांचा शेततळ्यात बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना मंगळवार ३ जून रोजी सकाळी उघडकीस आली. ही दुर्दैवी घटना कोनड बु. शिवारात घडली असून, मृत्यू झालेले तिघेही वरूड येथील रहिवासी होते. यश अनिल जोशी (वय १४), दिपाली रमण जोशी (वय ९) आणि रोहन रमण जोशी (वय ७) अशी मृतांची नावे आहेत. विशेष म्हणजे, रोहन आणि दिपाली हे सख्खे भाऊ-बहीण होते, तर यश हा त्यांचा चुलत भाऊ होता.

सोमवार २ जून रोजी सकाळी ही तीन मुले ओलांडा महादेव मंदिरात देवदर्शनासाठी गेली होती. मात्र, संध्याकाळ उलटून गेली तरी ते घरी परतले नाहीत. कुटुंबीयांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला, पण काहीच माहिती मिळाली नाही. रात्री उशिरापर्यंत कोणताही सुगावा न लागल्याने अखेर त्यांनी पोलिसांत बेपत्ताची तक्रार नोंदवली. यावरून पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. मंगळवारी पहाटे कोनड बु. ते जाफ्राबाद रस्त्यावरील सुभाष परिहार यांच्या शेततळ्यात तीन मृतदेह पाण्यावर तरंगताना दिसले.

ही माहिती समजताच स्थानिक ग्रामस्थ आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहांची ओळख पटवली असता, हे तिन्ही मृतदेह त्या बेपत्ता मुलांचे असल्याचे स्पष्ट झाले. प्राथमिक तपासात या मुलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचे दिसून आले आहे.पोलिसांनी या घटनेचा अधिक तपास सुरू केला असून, ही घटना अपघाती असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तरीही, या मागचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलीस सखोल चौकशी करत आहेत.

या तिघांच्या मृत्यूने वरूड गावात आणि त्यांच्या कुटुंबियांवर दुखाचा डोंगर कोसळला आहे. एकाच कुटुंबातील तीन निरागस जीव अशा अकस्मात जाण्याने गावकरी हादरून गेले आहेत. ही घटना परिसरात चर्चेचा विषय बनली असून, सर्वत्र शोक व्यक्त केला जात आहे.

## नजीक पांगरी येथील रखमाबाई वाघ यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे ) :** नजीक पांगरी ता.बदनापूर,जिल्हा जालना येथील रखमाबाई पांडुरंग वाघ वय ५९, यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले असून , त्यांच्या पश्चात पती,मुलगा व तीन मुली असा परिवार आहे. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल नजीक पांगरी परिसरात सर्वत्र शोक व्यक्त करण्यात येत आहे. त्या जेइएस महाविद्यालयातील प्रा. डॉ. बाबासाहेब वाघ यांच्या आई असून जेईएस महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांतर्फे त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ जून २०२५

# अवकाळी विळखा...







शेती व्यवसाय एक जुगार झाला आहे. दरवर्षी हा जुगार तो खेळतो आणि हरतो ही. तरीही पुढच्या हंगामात सारं काही विसरून तो पुन्हा नव्या जोमाने कामाला लागतो. कधी पाऊस खूपच पडतो, तर कधी कोरडाच हंगाम रहातो. पडला तरी गारपीट आणि अवकाळी . ईथल्या बळिवंताच्या वाटयाला कायमच हे अस्मानी सुलतानी दुःखभोग येतात. त्यात सर्वच भागातील शेतकरी भरडला जातो. त्यातून सावरणेही त्याला अवघड होऊन बसते.

मढे झाकुन पेरणी करणारा हा कुणबी माझा कायमच उपेक्षेचा धनी ठरतो आहे. या वर्षी कधी नव्हे तो बळिराजा जमिनीच्या उन्हाळ मशागतीला लागला होता. मागील वर्षी त्या मानाने कमीच पाऊसमान झाले होते. तरीही जे येईल ते पदरात पाडून तो या जगरहाटीत सामील होवून जगण्याच्या लढाईत व्यस्त असतांना, लग्न सराई, मुलांचे शिक्षण, रोजगार, मजुरी किंवा अन्य कामधंदा याच्या शोधात असंख्य शेतकरी बांधव असतांना या वर्षी झालं गेलं विसरून जाऊन पुन्हा नव्या उमेदीने, नव्या जोमाने नव्या लढाईला तो सज्ज झाला होता.

डोळ्यात असंख्य स्वप्न उराशी बाळगून तो आयुष्याचं गणित मांडत असतांनाच त्याच्या समोर अगणित प्रश्न उभे रहातच असतात. शेतकरी जीवन म्हणजे केवळ प्रश्न अन् प्रश्नच. व्यथा वेदनाचं पीक. या साऱ्याच प्रश्नांना धीटपणे सामोरे जाऊन तो आपली वाटचाल सुरू ठेवतो. त्यासाठी आपलं ऊभ आयुष्य खर्ची घालतो. शेती मातीवरच त्याच्या स्वप्नांचा डोलारा ऊभा असतो. तीच त्याची तारणहार असते. तिनेच आधार देण्याऐवजी दगाफटका दिला तर त्यानं जगावं कसं ? जगावं की मरावं ? या प्रश्नांच्या खोल गर्तेत तो बुडालेला असतो.

शेती असा व्यवसाय आहे तो कायमच तोट्यात असतो. शेतकरी शेतीला आपली काळी आई मानतो. त्यामुळे तिला तो प्राणपणाने जपतो. कधीच फायदया तोट्याचा विचार त्याच्या समोर नसतो. तिची ओटी भरायला तो नेहमी प्रमाणे सज्ज असतो. मागील वर्षी जेमतेम पाऊस झाला. कुठे पडला तर कुठे नाही. आषाढी ही कोरडीच गेली. अशा बिकट परिस्थितीतही त्याने किडूक मिडूक विकून हंगाम साधला. अपेक्षित पाऊस झालाच नाही. परिणामी चांगले पीक आले नाही. उत्पादन खर्चही निघला नसल्याचे शेतकरी सांगतात. शेती व्यवसाय आज प्रचंड संकटात व अडचणीत आहे. वाढते खताचे, बीयाणाचे भाव, महागाई, मजूरांचा अभाव व वाढती मजुरी, यामुळे शेतीत राबायला कुणीच भेटत नाही. बैल बारदाना नामशेष झाला. रासायनिक खतांचा औषधांचा भरमसाट मारा यामुळे जमिनी नापिक झाल्या. त्यामुळे उत्पादन मिळत नाही. शेती वर अवलंबून असणाऱ्या कुटूंबाना प्रचंड सोसावं लागतं. ते याही वर्षी त्याच्या वाट्याला आलं. यावर्षी कधी नव्हे तो मे महिन्यातच वेळी अवेळी पडला. शेतकऱ्यांनी नांगरटी करून ठेवल्या. काही शेतकरी लग्न खात फिरत असतांनाच पावसाने धुडगूस घातला. हाता तोंडाला आलेले उन्हाळी पीके हातातून गेली. बाजरी, मका, कापूस, गहू, आंबा, मोसंबी, डाळिंब आदी पिकांना व फळबागांना खूप नुकसान सोसावं लागलं. कांदा , केळी या ठोक पीकाचं व शेतक ऱ्यांना दोन पैसे मिळवून देणाऱ्या पीकाचंही खूप नुकसान झालं.

अचानक आलेल्या या पावसानं सारीकडे दानादान झाली. घरावरची पत्रे उडाली. झाडे उन्मळून पडली. ग्रामीण भागात ऐन उन्हाळ्यात प्रचंड उकडत असतांना वीज रात्ररात्र गायब झाली. त्यामुळे गरमटात दिवस काढावे लागले. या वर्षी लग्न ही खूप होते. लग्नाला हजेरी लावता लावता दमछाक झाली. ग्रामीण भागात लग्नाचे फारच हाल झाले. अवकाळी पावसामुळे मंडप उडाले. सगळीकडे धुराळाच धुराळा, वीज गायब झाली. झाडे पडली. कशीबशी अशा वातावरणात लग्ने जिवमुठीत धरून पार पाडावी लागली. शेतकऱ्यांचा जीव टांगणीला पडला. काही शेतकरी अजून मशागतीलाच लागले नव्हते. नांगरटी साठी ट्रॅक्टरचा शोध घेतांना च प्रचंड दमछाक झाली.

रानात कपाशीच्या पळाट्या तश्याच पडल्या होत्या. पालकाटया तशाच उभ्या. लग्न सराई संपली की लगेच कामाला लागू असे चित्र सवित्रिक असल्याचे दिसत असतांनाच अवकाळी पावसाने त्याचे हाल बेहाल करून टाकले. त्यातच खता बीयाणाचे भाव गगनाला भिडले. शेतकऱ्यांच्या माथी बोगस खते व बियाणे मारली जातात. त्यामुळे अपेक्षित उत्पादन त्याला मिळत नाही. जालना जिल्हयात तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हयात सर्वाधिक अवकाळीचा फटका बसला. केशर आंबे असतील किंवा गावरान आंबे यांचे खूप नुकसान झाले. अन्य ठिकाणी द्राक्षे, डाळिंब, केळीच्या बागा अस्ताव्यस्त होऊन खूप नुकसान झाले.

हे नुकसान भरून येणारे नाही. बदनापूर - अंबड परिसरातील माहेर भायगाव, देशगव्हाण , वाकुळणी, कोळघर, चिकणगाव, बाजार वाहेगाव आदी परिसरात प्रचंड ढग फुटी झाली. सगळीकडे पाणीच पाणी. कधी नव्हे ते उन्हाळ्यातच नदी, नाले, तलाव फुल झाले. अजूनही शेतात वापसा नसल्याचे त्या भागातील शेतकऱ्यांनी सांगितले. यंदा मशागतीची कामे लांबली. उन्हाळ पाळया कमीच पडणार. काही शेतकरी डायरेक्ट फुल्या पाडून कपाशी लावण्याच्या तयारीत आहेत. नांगरट उशीरा झाल्यामुळे त्याचा फार उपयोग होणार नाही. ग्रामीण भागात एकच धांदल उडाली असून मशागतीची कामे खोळंबली आहेत. अवकाळी पावसाचा फटका सर्वांनाच सहन करावा लागला असला तरी मृग साधला जावून या वर्षी भरपूर पाऊस पडावा अशा अपेक्षा शेतकरी करतांना दिसून येतात.

अवकाळी काही शेतकऱ्यांना नविन नाही. त्यातूनही बाहेर पडून पुन्हा नव्या उमेदिने शेतकरी कामाला लागतील असा आशावाद बाळगणे गैर नाही. हे ही दिवस जातीलच. या अवकाळी विळख्यातून बळिराजा ने बाहेर पडून पुन्हा नव्या ताकदीने पेरणी करण्यास सज्ज व्हावे. त्याच्या जीवनात नवचैतन्य, आनंद आणि नवा आशावाद निर्माण होवून त्याचं जगणं सुकर व समृद्ध व्हावं, यासाठी विधात्याकडं पाऊस पाण्याचं दान मागू या !



**प्रा. डॉ. शिवाजी हुसे**
राज्य प्रवक्ते,
स्वाभिमानी शेतकरी संघटना .
(आता उठवू सारे रान ,
या सदरातील लेख )

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०६ जून २०२५

# विद्यापीठांच्या स्वायत्ततेचे आणि शैक्षणिक स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची गरज !

आज विद्यापीठे अभूतपूर्व आव्हानांचा सामना करत आहेत. भारतात गेल्या तीन दशकांपासून हे आव्हान वाढत असले तरी, अमेरिकेत जानेवारी २०२५ मध्ये अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पदभार स्वीकारल्यापासून ते मोठ्या प्रमाणावर उदयास आले आहे. विद्यापीठांकडून समाजाच्या असलेल्या अपेक्षा बदलत असल्याने इतरत्रही हे आव्हान वाढत आहे. ट्रम्प प्रशासनाने हार्वर्ड विद्यापीठाचे ३.२ अब्ज डॉलरचे अनुदान आणि कंत्राटे गोठवली आहेत. हार्वर्डचा करमुक्त दर्जा (tax-exempt status) रद्द करण्याच्या हालचाली सुरू आहेत, ज्यामुळे हार्वर्डला काहीशे दशलक्ष डॉलरसचा फटका बसणार आहे. हार्वर्डचे अध्यक्ष ॲलन एम. गार्बर यांनी म्हटले आहे की, राजकीय मतभेदांमुळे शैक्षणिक संस्थांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ शकतो. कारण निधीमध्ये कपात करून विद्यापीठांना विद्यार्थी प्रवेश, कॅम्पसमधील निदर्शने, प्राध्यापक भरती आणि विविधता, समानता व समावेशन (डीईआय) कार्यक्रमांबाबत विद्यापीठांना त्यांची धोरणे बदलण्यास भाग भाग पाडले जात आहे.भारतात, गेल्या ४० वर्षांपासून उच्च शिक्षण संस्थांवरील नियंत्रण शिक्षण मंत्रालय आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नोकरशाहीकडे अधिकाधिक सरकले आहे, परिणामी ते शिक्षणतज्ज्ञांच्या हातून निसटले आहे.

भारतीय शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापक आणि संशोधकांना अध्यापन आणि संशोधनाशी संबंधित वाढत्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. अलीकडेच एका प्रतिष्ठित खाजगी विद्यापीठाच्या बाबतीत हे दिसून आले की, ज्या संस्थांमध्ये ते काम करतात, त्या त्यांच्या बचावासाठी पुढे येत नाहीत. हे सर्व उच्च शिक्षण संस्थांच्या सामाजिक भूमिकेतील नाजूक संतुलन बिघडल्याचे दर्शवते. अमेरिकेची शिक्षण प्रणाली एक आदर्श होती, ज्याचे अनुकरण केले जात होते, पण आता ती देखील खिळखिळी होत आहे. अंतर्निहित तणावविद्यापीठांच्या सामाजिक भूमिकेत एक अंतर्निहित तणाव आहे. एका बाजूला, त्यांना समाजासमोरील विकसनशील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सामाजिकदृष्ट्या उपयुक्त ज्ञान निर्माण करणे आवश्यक आहे. तर दुसऱ्या बाजूला त्यांच्याकडून सध्याच्या सामाजिक संरचनांचे पुनरुत्पादन करण्याची अपेक्षा केली जाते. आपली सर्जनशील भूमिका पूर्ण करण्यासाठी, शिक्षण क्षेत्राला स्वायत्तता आवश्यक आहे. सर्जनशीलतेचे हृदय आणि आत्मा हेच समाजाला गतिमान बनवते. दुर्दैवाने, राज्यकर्ते केवळ तोंडदेखले बोलून त्याला पाठिंबा देतात, परंतु प्रत्यक्षात त्या केवळ पोकळ बाता आहेत.

स्वायत्तता शिक्षणतज्ज्ञांना उदयास येत असलेल्या सामाजिक आव्हानांवर दीर्घकालीन दृष्टिकोन ठेवण्यास, किंबहुना त्यांची अपेक्षा करण्यास सक्षम करते. वेगाने वाहणाऱ्या बदलाच्या गतीमुळे, समाजाला त्या बदलाची जाणीव होईपर्यंत त्यावर उपाययोजना करण्यासाठी तोपर्यंत खूप उशीर झालेला असतो. उदा. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि समाज माध्यमांमधील विकासामुळे रोजगाराची आव्हाने, फेक न्यूजचा मुद्दा आणि युद्धाचे स्वरूप यात बदल होत आहेत. स्वायत्तता सध्याच्या रूढ विचारसरणीला आव्हान देण्यास सक्षम करते आणि नवीन ज्ञान निर्मितीला प्रोत्साहन देते. गॅलिलिओने चर्चला आव्हान दिले नसते, तर आपणाला या विश्वाचे आकलन झाले नसते. जेव्हा शिक्षणतज्ज्ञ स्वतःच्या गृहीतकांना (assumptions) प्रश्न विचारतात, तेव्हा गतिशीलता येते. शैक्षणिक क्षेत्र (Academics) हे वेळखाऊ प्रक्रियेची निर्मिती आहे. महालनोबीस (Mahalanobis) सारखे व्यक्तिमत्व कसे घडवायचे हे आपल्याला माहित नाही. ते विद्यापीठाने दिलेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या (freedom of thought) वातावरणातून उदयास आले. 'शॉटगन अप्रोच' (shotgun approach) प्रमाणे, ही शिक्षण प्रणाली मूळ विचारवंत (original thinkers) तयार करते जे त्यांच्या विषयाची दिशा बदलतात आणि समाजाला नवीन मार्ग दाखवतात. जितके मोठे कार्यक्षेत्र (wider the catchment area), तितके उत्कृष्टता निर्माण होण्याची शक्यता जास्त (higher the chance of producing excellence) असते. स्वायत्तता ही सर्वार्थाने आवश्यक आहे.

विद्यापीठांना नवीन ज्ञान निर्माण करणाऱ्या वैयक्तिक शिक्षणतज्ज्ञांचे संरक्षण करण्यासाठी स्वार्थी हितसंबंधांपासून स्वायत्तता हवी आहे. स्वायत्तता केवळ कुलगुरू किंवा संस्थेच्या संचालकासाठी नसून, ती संस्थांच्या संरचनेत रुजणे असणे आवश्यक आहे, जेणेकरून वैयक्तिक शिक्षणतज्ज्ञांच्या कार्यपद्धतीतही ती टिकून राहील.स्वायत्तता शिक्षणतज्ज्ञांना त्यांच्या विषयाबद्दल स्वतःचा दृष्टिकोन विकसित करण्यास सक्षम करते, जे त्यांच्या संशोधन आणि अध्यापनाला मार्गदर्शन करते. यामुळे त्यांना रूढ विचारसरणीला आणि लादलेल्या गोष्टींना प्रतिकार करण्यास मदत होते, ज्यामुळे मौलिकता (originality) पुढे येते. रूढ विचारसरणीला आव्हान देणे हा शिक्षणतज्ज्ञांचा दुसरा स्वभाव असला पाहिजे, ज्यात त्यांच्या स्वतःच्या संस्थांचाही समावेश आहे. यामुळे संस्थांमधील निर्णय प्रक्रिया कदाचित मंदगतीने होईल, परंतु त्यामुळे अधिक मजबूत (robust) निर्णय घेता येतात. या संस्था चालवणाऱ्या अधिकाऱ्यांनी हे मान्य करून लोकशाही पद्धतीने कार्य केले पाहिजे. मतभेद (Dissent) आवश्यक आहे, ते दूर करणे फार काही अवघड नाही. एक नोकरशहा किंवा नोकरशाहीने प्रभावित झालेले शिक्षणतज्ज्ञ हे मात्र समजून घेणार नाहीत आणि म्हणूनच असे लोक विद्यापीठाचे नेतृत्व करण्यासाठी म्हणून बहुतेक वेळा योग्य नसतात. रूढ विचारसरणीला आव्हान दिल्याने 'विद्यापीठे कशी असावीत' आणि 'राज्यकर्त्यांच्या त्यांच्याकडून काय अपेक्षा आहेत' यांमध्ये तणाव निर्माण होतो.

उच्च शिक्षण संस्थांच्या प्रमुखांना हा तणाव हाताळावा लागतो आणि नोकरशाही मानसिकता असलेल्यांपेक्षा शिक्षणतज्ज्ञ या कामासाठी अधिक योग्य असतात. विद्यापीठांनी मतभेदांना प्रोत्साहन दिल्यास ती सत्ताविरोधी ठरतात, तर राज्यकर्त्यांना त्यांच्याकडून आपला अजेंडा पुढे नेण्याची आणि सध्याचे सामाजिक संबंध पुनरुत्पादित करण्याची अपेक्षा असते. सामंतशाही व्यवस्थेला (Feudal system) राज्यकर्त्यांच्या जन्माधिकाराला आव्हान दिलेले आवडणार नाही आणि भांडवलशाही व्यवस्थेला (Capitalist system) लोकशाहीला कमी लेखणाऱ्या 'डॉलर व्होट'च्या कल्पनेला आव्हान देणारे जागरूक कामगार (Aware workers) नको असतात, त्याऐवजी त्यांना नम्र कामगार (Docile labour) हवे असतात. स्वायत्तता अडथळा ठरते का?संकुचित विचारसरणी असलेल्या आणि आत्मविश्वास नसलेल्या राजवटींना (regimes) 'अँटी-एस्टॅब्लिशमेंट' (anti-establishment) म्हणजे प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धचा स्वभाव घृणास्पद (anathema) वाटतो. त्यांना आपला अजेंडा पुढे रेटण्यासाठी स्वायत्तता (autonomy) मर्यादित करावी लागते. त्यांना नवीन कल्पनांची गरज नसते आणि त्यांचे मूल्यही वाटत नाही, त्यामुळे विद्यापीठांची भूमिका आणि त्यांचा सामाजिक दर्जा कमी होतो. यामुळे शिक्षणतज्ज्ञांना जैसे थे स्थिती (status quoist) स्वीकारण्यास भाग पाडले जाते. सध्याचा जलद तांत्रिक बदल (rapid technical change) आणि बाजारीकरण (marketisation) यामुळे भविष्याबद्दल एक प्रकारचा धुरळा (mist of the future) निर्माण झाला आहे. याचा परिणाम अल्प-मुदतीचा विचार (short termism) आणि समाजाच्या भविष्यकाळाबद्दल तसेच भूतकाळाबद्दल एक कुंठित दृष्टिकोन (stultified view) तयार होण्यावर होतो.

गुंतागुंतीच्या कल्पनांना (complex ideas) ना समजून घेतले जाते ना त्यांना महत्त्व दिले जाते; त्याउलट त्यांची विद्रुप नक्कल (caricature) केली जाते. शासकांच्या अजेंड्याला अनुकूल अशी अऐतिहासिक सामाजिक दृष्टी (ahistorical view of society) प्रसारित केली जाते. लोकांमध्ये असलेल्या सध्याच्या विभाजनांचा उपयोग संकुचित अजेंडा पुढे नेण्यासाठी आणि अधिकाधिक जटिल बनलेल्या समाजाची विडंबना करून रूढीवाद (conservatism) पसरवण्यासाठी केला जातो. इंटरनेटद्वारे होणारे 'लोकशाहीकरण' (Democratization) तात्काळ कल्पना (instant ideas) आणि मते (opinions) पसरवून या प्रक्रियेस मदत करत आहे, ज्यामुळे काल्पनिक गोष्टींनाच सत्य (imaginary is perceived to be the reality) मानले जाते. हे शासकांना त्यांचा अजेंडा पुढे नेण्यास मदत करते.अमेरिका आणि चीन या दोन्ही देशांनी दीर्घकालीन अजेंड्यावर (long term agenda) काम केले आहे, ज्यामुळे त्यांना वेगाने जागतिकीकरण होत असलेल्या जगात (fast globalising world) वर्चस्व गाजवता आले आहे. हे जग तंत्रज्ञान आणि कल्पनांच्या जलद उत्क्रांतीचे (rapid evolution of technology and ideas) साक्षीदार आहे.

यासाठी, अमेरिकेने स्वतंत्र विद्यापीठे आणि संशोधन संस्थांची (independent universities and research institutes) एक मोठी प्रणाली तयार केली आणि जगभरातून प्रतिभावान लोकांना आकर्षित केले. मात्र, आता अमेरिकेतील विद्यापीठांवर आणि त्यांच्या प्राध्यापकांवर होणाऱ्या हल्ल्यांमुळे ही प्रणाली कमकुवत केली जात आहे (now being undermined).निधी आणि स्वायत्तता (Funding and autonomy)कोलंबिया विद्यापीठाने दबावाखाली नमते (buckled under pressure) घेतले, परंतु हार्वर्ड (Harvard) विद्यापीठाने मात्र आपली भूमिका कायम ठेवली आणि सरकारला न्यायालयात आव्हान दिले आहे. त्याला शिक्षणतज्ज्ञांकडून आणि १५० हून अधिक विद्यापीठांकडून पाठिंबा मिळाला आहे. पण प्रश्न असा आहे की, मोठ्या देणग्या (endowments) असलेल्या खाजगी विद्यापीठांना सरकारी निधीवर अवलंबून का राहावे लागते?शिक्षण आणि संशोधन हे खर्चिक विषय आहेत. विद्यापीठांमधील प्राध्यापकांना विज्ञान आणि तंत्रज्ञान, समाजशास्त्र आणि कला व संस्कृती या सर्व क्षेत्रांतील प्रकल्पांसाठी निधीची आवश्यकता असते. विकासामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान महत्त्वाचे आहे, परंतु ज्या सामाजिक वातावरणात ते फुलते ते देखील तितकेच महत्त्वाचे आहे. सर्जनशीलता (creativity) बहु-आयामी आहे आणि त्यासाठी संशोधनाचा सर्वांगीण दृष्टिकोन (holistic view) आवश्यक आहे. उच्च शिक्षणासाठी मिळणारा निधी स्वायत्तता टिकवून ठेवण्यासाठी कोणत्याही अटींपासून (strings) मुक्त असावा.

खाजगी क्षेत्रातील निधी मोठ्या प्रमाणात नफ्याच्या उद्देशाने जोडलेला असतो आणि त्यामुळे मर्यादित स्वायत्तता मिळते. अशा परिस्थितीत सार्वजनिक निधीवर भार पडतो. असे केवळ भारतातच नाही, तर अमेरिकेतही अशीच परिस्थिती आहे. केवळ उदारमतवादी (liberal) सत्ताधारीच कोणताही अडथळा नसलेला निधी (untied funds) देण्याचा विचार करू शकतात.भारतात, खाजगी क्षेत्र संशोधनावर कमी खर्च करत असल्याने, सार्वजनिक निधी अत्यंत महत्त्वाचा आहे. १९९१ नंतर, भारतात दरडोई सार्वजनिक निधी कमी झाला आणि उच्च शिक्षण संस्थांना निधीची कमतरता भासू लागली. यामुळे राज्याला केवळ स्वायत्तता मर्यादित करता आली नाही, तर या संस्थांच्या प्रमुखपदी आपल्या विचारसरणीच्या (proclivity) लोकांना नियुक्त करून आणि त्यांना मर्यादित स्वायत्तता देऊन आपला अजेंडा पुढे नेण्याचीही संधी मिळाली. उच्च शिक्षण संस्थांची मुख्य भूमिका सामाजिकदृष्ट्या उपयुक्त ज्ञान (socially relevant knowledge) निर्माण करणे ही आहे. यासाठी रूढीवादाला आव्हान देण्यासाठी स्वायत्तता आवश्यक आहे, ज्यामुळे त्या 'अँटी-एस्टॅब्लिशमेंट' (प्रस्थापित व्यवस्थेविरोधी) वाटू शकतात. सामाजिक संरचनांचे पुनरुत्पादन करणाऱ्या आणि नवीन ज्ञान निर्माण करणाऱ्या त्यांच्या भूमिकेतील हाच सामाजिक तणाव आहे.

हळूहळू वाढत असलेल्या अल्पकालीन दृष्टिकोनामुळे (creeping short termism) समाजाबद्दलची समज सोपी झाली आहे आणि रूढीवाद वाढत आहे. अनेकदा काल्पनिक गोष्टींनाच (imaginary) नवीन ज्ञान म्हणून सादर केले जातात. या सर्वांमुळे समाजात विद्यापीठांचे महत्त्व कमी होते आणि त्यांची बाह्य प्रतिमा (facade) कायम ठेवून त्यांना आतून पोकळ केले जाते, ज्यामुळे त्यांच्या स्वायत्ततेचे रक्षण करण्यासाठी कोणीही उरत नाही. हार्वर्डचे डॉ. गार्बर यांनी याच गोष्टीवर लक्ष वेधले होते.

**मूळ लेखक प्रा. अरुण कुमार,**
अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली,

**मराठी अनुवाद : प्रा. डॉ.प्रियदर्शन भवरे,**
बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना येथे समाजशास्त्राचे अध्यापन करतात.
संपर्क: bhawarepriyadarshan@gmail.com

हा मूळ इंग्रजी लेख द हिंदू (मुंबई आवृत्ती) या वर्तमानपत्रात सोमवार, ०२ जून, २०२५ रोजी प्रसिद्ध झाला आहे. मूळ लेखासाठी क्लिक करा..
https://www.thehindu.com/opinion/lead/the-university-under-attack-universities-undermined/article69645974.ece